दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.३० एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# देशात कोळसा टंचाई, बत्ती गुल होण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**देशात उष्णतेचा कहर कायम असताना अनेक राज्यांमध्ये कोळसा संकट निर्माण झालं आहे. कोळशाची टंचाई असल्यानं वीज निर्मितीवर परिणाम झाला आहे. अनेक वीज निर्मिती केंद्रांमधील कोळशाचा साठा संपत आला आहे. या ठिकाणी कोळशाचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं ६५७ प्रवासी रेल्वे गाड्या रद्द केल्या आहेत.**



कोळसा वाहून नेणाऱ्या मालगाड्यांना सहज मार्ग मिळावा आणि वीज निर्मिती केंद्रांमध्ये वेळेत कोळसा पोहोचावा यासाठी प्रवासी गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. दिल्ली, राजस्थान, महाराष्ट्रासह देशातील १३ राज्यांमध्ये वीज संकट आहे. उष्णता वाढल्यानं विजेची मागणी वाढली आहे. त्यातच कोळसा टंचाईचं संकट निर्माण झालं आहे.

महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, गुजरात, पंजाब, झारखंड, हरियाणा, उत्तर प्रदेश, दिल्ली, राजस्थानात विजेची कमतरता आहे. त्यामुळे लोडशेडिंग सुरू झालं आहे. ऐन उन्हाळ्यात लोकांना त्रास सहन करावा लागत आहे.

रशियाकडून होणारा नैसर्गिक वायूचा पुरवठा थांबला आहे. त्यामुळे कोळशापासून निर्माण होणाऱ्या वीजेवरील भार वाढला आहे. सध्या देशातील औष्णिक उर्जा केंद्रांत २१ मिलियन टन कोळसा साठा शिल्लक आहे. हा साठा १० दिवस पुरेसा आहे.

# चिरनेर येथील सचिन घबाडी यांच्यावर प्राण घातक हल्ला

## हल्लेखोर पसार ; घबाडी उपचारार्थ रुग्णालयात दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील काँग्रेस पक्षाचे युवा नेते तथा सामाजिक क्षेत्रात हिरीरीने सहभाग घेणारे दानशूर व्यक्तीत्त्व सचिन घबाडी यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी काल सायंकाळी ठिक ७ वाजताचे सुमारास अचानकपणे प्राण घातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात सचिन घबाडी यांना दुखापत झाली असून ते पनवेल येथील रुग्णालयात उपचार घेत आहेत. तर उरण पोलिस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

चिरनेर गावचे रहिवासी असलेले सचिन घबाडी हे युवा काँग्रेस पक्षाचे नेते आहेत. त्यांनी आपल्या राजकीय पादुका बाहेर ठेवून गावात अनेक समाजाभिमुख उपक्रम राबविले आहेत. गरीब गरजूंच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच गाव पातळीवरील समस्यांचे निराकरण करण्यासाठी ते शासकीय स्तरावर सतत प्रयत्न करत आहेत. त्याच्या या समाजाभिमुख कार्याचा वसा त्यांची पत्नी सौ.शितल सचिन घबाडी या चिरनेर ग्रामपंचायतीच्या विद्यमान सदस्या म्हणून चालवत आहेत.

सचिन घबाडी हे नेहमी प्रमाणे आपल्या शेतावरील फार्म हाऊसवरून काल सायंकाळच्या सुमारास ७ वाजताचे दरम्यान चिरनेर येथील रस्त्यावरून जात असतांना वाहनात दबा धरून बसलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी अचानकपणे त्यांच्यावर प्राण घातक हल्ला केल्याची घटना घडली आहे.



या हल्ल्याची माहिती रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य बाजीराव परदेशी, तिरंगा पतपेढीचे चेअरमन अलंकार परदेशी, काँग्रेस पक्षाचे युवा तालुकाध्यक्ष राजेंद्र भगत, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते नितेश ठाकूर, अमर ठाकूर, घबाडी यांचे कुटुंबीय तसेच त्यांचे सहकारी यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. परंतु हल्लेखोरांनी आपल्या वाहनातून पोबारा केला. जखमी अवस्थेत पडलेल्या सचिन घबाडी यांना तात्काळ पनवेल येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. या घटनेसंदर्भात उरण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

# शासकीय कार्यालयात बायोमेट्रिक यंत्रणा बसवा

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा हे तालुक्याचे ठिकाण असल्याने कामासाठी नागरिकांना विविध कार्यालयात जावे लागते, मात्र कर्मचारी व अधिकारी कार्यालयात वेळेत उपस्थित नसल्याने पहिल्याच वेळेत काम झाले आहे असे होत नाही. यामुळे नागरिकांच्या पदरी केवळ निराशाच पडत आहे. किमान चार ते पाच वेळा फेऱ्या मारल्यावर काम होते अशी स्थिती तालुक्यातील कार्यालयांची आहे. कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या कामात शिस्तबद्ध व वक्तशीरपणा यावा यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक यंत्रणा प्रणाली अमलात आली आहे; परंतु तळा तालुक्यातील बहुतेक शासकीय कार्यालयांमध्ये अद्यापही या यंत्रणेचा अभाव दिसून येत आहे.राज्यात ई-प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी शासनाच्या प्रत्येक विभागात प्रशासकीय यंत्रणा हायटेक होत आहे. प्रत्येक शासकीय कार्यालयामध्ये काम करणारे कर्मचारी व अधिकारी वेळेवर कामावर हजर व्हावेत, याची नोंदणी होण्यासाठी बायामेट्रिक यंत्रणा (थम्ब) कार्यान्वित करण्यात आली आहे.मात्र तळा तालुक्यातील सरकारी कार्यालयांत अशी सुविधा नसल्याने कर्मचारी मनाला वाटेल तेव्हा येतात व जातातही.


अधिकारी व कर्मचारी यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी कोणीही नसल्यामुळे नागरिकांची अनेक कामे खोळंबली आहेत. कामे वेळेवर होत नसल्याने दूर गावांतून कामासाठी येणाऱ्या ग्रामस्थांना आर्थिक भुर्दंड व नाहक मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. किरकोळ कामासाठीही चार-पाच दिवस फेऱ्या माराव्या लागत आहेत. यामुळे वेळ तर वाया जात आहेच सोबत पैसेही. अधिकारी व कर्मचारी कार्यालयात येण्याआधीच ग्रामस्थ पोहोचलेले असतात मात्र कार्यालयीन वेळेचे कोणतेही भान अधिकारी व कर्मचारी यांना नसते. तालुक्यातील सरकारी कार्यालयांना भोंगळ कारभाराचे ग्रहण लागल्याची संतप्त प्रतिक्रि या नागरिक व्यक्त करत आहेत. तळा तालुक्यात तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, तालुका कृषी कार्यालय, वन अधिकारी कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, तलाठी, महावितरण कार्यालय अशी कार्यालये आहेत. थोड्या फार फरकाने सर्व कार्यालयाची स्थिती सारखीच असल्याचे नागरिक सांगतात.

# ११ वर्षे न्याय न मिळाल्याने पेण अर्बन बँक ठेवीदारांचे २ मे रोजी लाक्षणिक धरणे आंदोलन

**दै.रायगड नगरी । पेण**

दि पेण को-ऑपरेटीव्ह अर्बन बँकेत सुमारे ७५८ कोटीचा घोटाळा होऊन ११ वर्षे उलटून गेल्यानंतर देखील अर्बन बँकेच्या सुमारे २ लाख ठेवीदारांना न्याय मिळाला नाही. न्याय न मिळाल्याने पीडित ठेवीदारांच्या तीव्र भावना व्यक्त करण्यासाठी सोमवार दिनांक २ मे २०२२ रोजी पेण नगरपालिके समोरील हुतात्मा भाई कोतवाल चौकात पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समिती लाक्षणिक धरणे आंदोलन करणार आहे. या आंदोलनात पेण अर्बन बँकेचे ठेवीदार मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत, अशी माहिती संघर्ष समितीचे अध्यक्ष नरेंन जाधव यांनी येथे पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेला पेण अर्बन बँके संघर्ष समितीचे अध्यक्ष नरेंन जाधव, सुरेश वैद्य, नगर-सेवक अजय क्षिरसागर आदी उपस्थित होते.

पेण अर्बन बँकेने सुमारे ६० व्यक्तींना ११८ खात्यामार्फत कोट्यावधी रुपयांची नियमबाह्य कर्ज दिली. शिशिर धारकर, संतोष शृंगारपुरे, शर्मा यांनी आपल्या मित्र व नातेवाईकांना सुमारे ३५० कोटींची बेकायदेशीर कर्ज दिली. व त्यामुळेच बँकेत ७५८ कोटींचा घोटाळा झाला, असा आरोप नरेंन जाधव यांनी यावेळी केला. यासंदर्भात न्यायालयात ठेवीदारांतर्फे दाद मागण्यात आली. १६ डिसेंबर २०१५ रोजी उच्च न्यायालयाने अफरातफर केलेले ५९८.७२ कोटी रुपये वसुली साठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कृती समिती स्थापन केली. या समितीमध्ये रायगड .../२



> पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना ५ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळावे. या कायद्यात कारवाई खाली असलेल्या बँकांना ५ लाख रुपयांचा विमा संरक्षण देण्याची तरतूद आहे. पेण अर्बन बँक अजून अवसायनात निघालेली नाही. त्यामुळे सदर तरतुदीनुसार पेण अर्बनच्या ठेवीदारांना ५ लाखांचे विमा संरक्षण मिळावे.
>
> **- नरेन जाधव - पेण अर्बन बँक संघर्ष समितीचे अध्यक्ष**

## संक्षिप्त...

### नवनीत राणा, रवी राणा यांना आणखी एक धक्का

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांचा घरचे जेवण मिळावे म्हणून केलेला अर्ज मुंबई सत्र न्यायालायनं फेटाळून लावला आहे. राणा दाम्पत्य सध्या न्यायालयीन कोठडीत असून त्यांच्या जामीन अर्जावर उद्या सु-नावणी होणार आहे. त्यापूर्वी मुंबई सत्र न्यायालयानं हा निर्णय दिला आहे. मुख्यमंत्री यांचे खासगी निव-ासस्थान मातोश्रीवर जाऊन हनुमान चालीसा पठण करण्याची भूमिका राणा दाम्पत्यानं घेतली होती. दोन समुदायांमध्ये तेढ निर्माण होईल अशी भूमिका आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विरोधात प्रक्षोभक वक्तव्य केल्या प्रकरणी नवतीन राणा यांच्यावर राजद्रोहाचा आणि सरकारी कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न करणे असा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राणा दाम्पत्यानं २३ एप्रिलला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री या निवासस्थानाबाहेर जाऊन हनुमान चालिसा पठण करणार असल्याचं आव्हान दिलं होतं. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २४ एप्रिलला महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार असल्यानं मातोश्रीवर जाणार नसल्याची भूमिका राणा दाम्पत्यानं घेतली होती. मात्र, मुंबई पोलिसांनी नवनीत राणा आणि रवी राणा यांना अटक केली. २४ एप्रिलला वांद्रे कोर्टानं राणा दाम्पत्याला १४ दिवसांची कोठडी सुनावली होती.

नवनीत राणा आणि रवी राणा यांनी मुंबई हायकोर्टात त्यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेले एफआयआर रद्द करावेत यासाठी धाव घेतली होती. मुंबई हायकोर्टानं राणा दाम्पत्याची याचिका फेटाळून लावली होती.

# एम.पी.९३ हा भूखंड लवकरच माथेरान पालिकेकडे हस्तांतरित करणार : ना.बाळासाहेब थोरात

**दै.रायड नगरी । माथेरान**

माथेरान हे सर्वांचे आवडते ठिकाण असून इथे मोठया प्रमाणावर पर्यटक येत असतात. स्वतःच्या वाहनाने येणाऱ्या पर्यटकांना दस्तुरी नाक्यावर जागेअभावी खूपच अडचणी निर्माण होत असतात याकामी माथेरानच्या पार्किंग व्यवस्थेसाठी आवश्यक असलेल्या दस्तुरी नाका येथील एम.पी.९३ हा भूखंड माथेरान पालिकेला हस्तांतरीत करण्याची महत्वपूर्ण मागणी माजी नगराध्यक्ष व माथेरान शहर काँग्रेसचे अध्यक्ष मनोज खेडकर यांनी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांना एम.पी. ९३ ची पार्श्वभूमी समजावून सांगितली. कोंकण आयुक्त यांनी सदर भूखंड माथेरान पालिकेस हस्तांतरित करण्यात यावा अशी सूचना केली आहे.

मनोज खेडकर हे नगराध्यक्ष असताना सन २००८ मध्ये एम.पी. ९३ हा प्लॉट वाडिया ट्रस्ट च्या नावे होता मात्र तो खालसा झाला होता. सदर प्लॉट गाड्यांच्या पार्किंग



साठी माथेरान पालिकेला महसूल खात्याने द्यावा अशी मागणी केली होती जिल्हाधिकारी विनायक निपुण यांनी तात्काळ कायदेशीर प्रक्रिया सुरू केली , नगरविकास उपायुक्त यांनी एम.पी. ९३ साठी .../२

# कोकण मॅरेज हॉलसमोर कारला अपघात

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोलीहुन कर्जतकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या कारवरील नियंत्रण सुटल्याने भरधाव कार रस्त्यांच्या बाजूला असलेल्या नाल्यात कोसळली. खोपोली - कर्जत रस्त्यांवरील कोकण मॅरेज हॉलसमोर ही घटना घडली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, कर्जत - खोपोली महामार्गावर कोकण मॅरेज हॉल समोरील एका सेंट्रो कारला अपघात झाला. खोप-ोलीहुन कर्जतकडे जाणारी सेंट्रो कार क्रमांक एमएच-१२, जेझेड ८४८६ भरधाव वेगाने जात कार असताना चालकांचे गाडीवरून नियंत्रण सुटल्याने कार रस्त्यावरून मोरीच्या कठडे तोडून नाल्या कोसळून अप-घात झाला.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवार दि. २९ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास हा अपघात झाला आहे. या अप-घात कोणतीही जीवितहानी झालेली नसली तरी कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे समजते.



# महाराष्ट्र दिनी पनवेलमध्ये अवतरणार परंपरा महाराष्ट्राची

## जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेतर्फे कलारसिकांना कार्यक्रमाची मेजवानी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था आणि सरगम संगीत अकॅडमी पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने एक मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पनवेल मधील हौशी कलाकारांनी एकत्र येऊन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये परंपरा महाराष्ट्राची या संगीतमय सुरांची मेजवानी ठेऊन पनवेल करांसाठी एक आगळी वेगळी भेट देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमा संदर्भात माहिती देताना सरगम संगीत अकॅडमीचे नरेश पाटील यांनी सांगितले पनवेलमधील विविध क्षेत्रातील मग ते राजकारण, वैद्यकीय क्षेत्र अभियंता क्षेत्र गृहिणी शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या हौशी कलाकारांना एकत्र घेऊन आम्ही आमच्या सरगम संगीत अकॅडमी च्या माध्यमातून पनवेल करांसाठी महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणारा मराठमोळा कार्यक्रम परंपरा महाराष्ट्राची हा करू इच्छितो ही संकल्पना आम्ही विरोधी पक्षनेते श्री प्रीतम जनार्दन म्हात्रे यांच्याकडे मांडली. या कार्यक्रमाला नृत्य दिग्दर्शन सुद्धा पनवेल मधीलच त्या क्षेत्रातील सौ मिताली पारंगे सौ अमृता भेरे श्री विनोद पाटील हे करणार आहेत. अशा प्रकारचे स्थानिक विविध क्षेत्रातील हौशी कलाकारांना घेऊन पनवेल मध्ये प्रथमच एक आगळा वेगळा उपक्रम होत आहे. या कार्यक्रमामध्ये पनवेलमधील ८० पेक्षा जास्त कलाकार सहभागी होणार आहेत महाराष्ट्र दिनानिमित्त दिवसाची सुरुवातच सकाळी आठ वाजता या कार्यक्रमा च्या ठिकाणी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती श्री शिवाजी .../२

> पनवेल मधील विविध क्षेत्रातील हौशी कलाकार एकत्र येऊन पनवेल करांसाठी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने परंपरा महाराष्ट्राची हा कार्यक्रम करू इच्छितात. या अशा लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सहभाग असणाऱ्या हौशी पनवेलकर कलाकारांना प्रोत्साहन देण्याच्या निमित्ताने माझ्या जे. एम. चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून पनवेल करांसाठी एक संगीत आणि नृत्याची कला रुपी मेजवानी सादर करण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत पनवेलकरांनी या सर्व कलाकारांना उपस्थित राहून प्रोत्साहन द्यावे असे मी सर्वांना या कार्यक्रमासाठी निमंत्रण देतो.
>
> **प्रितम जनार्दन म्हात्रे, अध्यक्ष जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था**

# अवैध गौणखनिज उत्खननामुळे मांडला मानवी वस्तीस धोका : स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या अनेक महिन्यांपासून मुरुड तालुक्यातील मांडला ग्रामपंचायत हद्दीतील डोंगरावर अवैध गौण खनिज उत्खनन केले जात असून याकडे स्थानिक प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याबाबत नाराजी व्यक्त होत असून गावाला उद्भवणारा संभाव्य धोका लक्षात घेऊन ग्रामस्थ आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचे समजते. याबाबत आपण लवकरच ग्रामस्थांच्यावतीने स्थानिक आमदार, पालकमंत्री, माजी आमदार, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी व मुरुड तहसीलदार यांना एक निवेदन सादर करणार असल्याचे मुरूड तालुका चर्मकार संघटनेचे तालुका अध्यक्ष सुरेश नांदगावकर व रोहिदास उत्कर्ष मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर महाडिक यांनी म्हटले आहे.

मांडला ग्रामपंचायत हद्दीतील गटनंबर १८८ /२अ मध्ये क्षेत्र ५६.६५.०० व ४९.९५.०० त्याचप्रमाणे मौजे पारगाण गट क्रमांक ३६ मध्ये जवळ जवळ सहाशे एकर वनक्षेत्रामध्ये अनधिकृतपणे हजारोंझाडांची कत्तल करून कित्येक हेक्टर क्षेत्रात १० ते १५ पोकलेन व जेसीबी या अत्याधुनिक यंत्रसामुग्री ने रात्रंदिवस दगड मातीचे अवैध गौण खनिज उत्खनन सुरू आहे. असेच उत्खनन सुरू राहिल्यास पुणे जिल्ह्यात घडलेली मालिन .../२



# वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने रहिवाशांच्या माहिती साठी टोल फ्री नंबर उपलब्ध करून देण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहती मध्ये रात्र बे रात्र वीज जात आहे त्यामुळे लहान मुलांची हाल होत आहे आणि सकाळी लवकर कामाला नागरिकांची खूप हाल होत आहे, वीज कशामुळे जाते त्यांचा कोणताही खुलासा महावितरण तर्फे प्राप्त झालेला नाही तरी वारंवार विदुयत पुरवता खंडित होत असल्याने रहिवाशांच्या माहिती साठी टोल फ्री नंबर उपलब्ध करून देण्याची शिवसेनेने कामोठे कार्यकारी अभियंता सिडको कामोठे व वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे .



शिवसेना शहरप्रमुख कामोठे राकेश गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन मनोहर त्रिमुखे शिवसेना उप विभाग प्रमुख प्र.१३ यांनी अमित भोसले उप शाखा प्रमुख , शिवकांत यादव गट प्रमुख यांच्या सह अतिरिक्त कार्यकारी अभियंता महावितरण विभागाचे सूर्यतर व महावितरण अधिकारी सूर्यवंशी यांची भेट घेऊन कामोठे या विभागात नेहमी प्रमाणे ऐन उन्हाळ्यात महिन्यात वीज दिवसातून ३ ते ४ वेळा जात आहे आणि रात्र बे रात्र वीज जात आहे त्यामुळे लहान मुलांची हाल होत आहे आणि सकाळी लवकर कामाला नागरिकांची खूप हाल होत आहे.

वीज कशामुळे जाते त्यांचा कोणताही खुलासा महावितरण तर्फे प्राप्त झालेला नाही आणि त्यांचा टोल फ्री नंबर जेव्हा पण वीज जाते तो बंद करून ठेवतात त्यामुळे टोल फ्री नंबर बंद असल्यामुळे नागरिकांना मध्ये संभ्रमावस्था निर्माण होतात, अशा परिस्थितील आपण काही आपली कामे असतील तर नागरिकांना पहिला १ किंवा २ तास अगोदर मोबाइलवर माहिती द्यावी आणि आपल्याला काही कामे करायची असेल

तर मंगळवारी कामे करून घ्यावे पण निदान एक दिवस आधी सोमवारी सगळ्यांना मोबाइलवर माहिती पुरवावी किती ते किती वाजे पर्यंत वीज येणार नाही किंवा या विषयाची सविस्तर माहिती कार्यकारी अभियंता सिडको कामोठे इथे उपलब्ध करून द्यावेत आणि टोल फ्री नंबर चालू ठेवावे. त्यामुळे अन्यथा तेथील नागरिक आणि रहिवाशांचा मोर्चा काढण्यात येईल असा इशारा शिवसेनेने दिला आहे.

# महिलाबचत गट व महिला उद्योजकांसाठी प्रदर्शन संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

चला आत्मनिर्भर भारत घडवूया ...! अभियानाच्या माध्यमातून महिलाबचत गट व महिला उद्यजोकांसाठी कर्जत मध्ये भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

महिलांमध्ये काम करताना बचतगटांची नेहमी एक समस्या ऐकायला मिळते. आम्ही उत्पादन तयार करतो पण तयार केलेल्या उत्पादनाला बाजारपेठ नाही, या समस्यांना सामोरे जाताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत करण्यासाठी योजना आणली वोकल फॉर लोकल चा नारा देऊन योजना आणून ते थांबले ना–हीत तर त्यांनी जेम पोर्टल च्या माध्यमातून बाजारपेठ ही उपलब्ध करून दिली.

कर्जत येथील रॉयल गार्डनच्या सभागृहात भाजप जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सहमतीने व महिला जिल्हा अध्यक्षा अश्विनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते,प्रदेश अध्यक्षा उमा खापरे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्षा नीलम गोंधळी, प्रदेश सचिव व जेमपोर्टल च्या प्रमुख वर्षा ढहाळे उपस्थित होत्या.

या सर्वांनी प्रदर्शनाला भेट देऊन अयोजकांना प्रोत्साहन दिले तर प्रत्येक स्टॉल धारकाशी सवांद साधून माहिती घेतली, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, जिल्हा चिटणीस दिपक बेहेरे,जिल्हा उपाध्यक्ष वसंत भोईर, जिल्हा चिटणीस रमेश मुंडे, कर्जत उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल,गीता चौधरी,उद्योग आघाडी सेल जिल्हा संयोजक मंदार मेहेंदळे,उपाध्यक्षा संध्या शारबीद्रे, युवा मोर्चा चिटणीस ऋषिकेश जोशी, राहुल वैद्य,मंडल अध्यक्ष मंगेश म्हसकर, युवा नेते किरण ठाकरे,युवा मंडल अध्यक्ष प्रमोद पाटील, कर्जत शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, नगरसेविका विशाखा जिनगरे, स्वामिनी मांजरे आदी सह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भेट देऊन हा उपक्रम यशस्वी केला.

या प्रदर्शनात ३६ उद्योजकांनी आ–पले स्टॉल लावले होते,भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाचे ( उमेद सखी मंच) यांने महिलाबचतगट व उद्योजक महिलांना व्यावसायिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे,या कार्यक्रमाचे आयोजन भाजप महिला मोर्चा व उमेदसखी मंच यांच्या माध्यमातून रायगड जिल्हा महिला सरचिटणीस मृणाल खेडकर, महिला मोर्चा जिल्हा चिटणीस बिनीता घुमरे, कर्जत नगरसेविका स्वामींनी मांजरे, कर्जत शहर अध्यक्ष महिला सरस्वती चौधरी यांच्या माध्यमातून करण्यात आले होते.



# विजय नागरथ यांनी शाळा नुतनी करणासाठी दिले चार लाख रुपये

**दै.रायगड नगरी । तळा**

चक्री वादळानंतर शाळांची मोठी दुरावस्था झाल्याचे चित्र तळा तालुक्यात समोर आले.सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक यांच्या पुढाकाराने उद्योजक विजय नागरथ यांनी तळेगाव येथील शाळेबद्दल कृतज्ञता म्हणून शाळा नूतनीकरणासाठी ४ लाख रुपये दिले आहेत. विजय नागरथ यांच्या देणगीतून रुपडे पालटलेल्या शाळा इमारतीचे विजय नगराथ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

गरीब विद्यार्थांची शाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजीपच्या शाळा इमारतींची अनेक ठिकाणी दुरावस्था झाली आहे. गळके छत, दरवाजे खिडक्यांची मोडतोड, फरशा उचकटलेल्या अशी अनेक शाळांची अवस्था दिसून येते. तळेगाव शाळेच्या इमारतीची दुरावस्था पाहून शाळा इमारतीच्या नूतनीकरणासाठी तळा तालुक्याचे सुपुत्र समाजसेवक कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नांनी विजय नागरथ यांनी मदतीचा हात पुढे केला

विजय नागरथ यांनी शाळा इमारतीचे नूतनीकरण व विद्यार्थांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध केल्या आहेत. शौचालये, स्वच्छतागृहे ,संरक्षक भिंत, शाळेच्या आवारात लादीचे काम संपूर्ण शाळेची रंगरंगोटी विजय नागरथ यांनी शाळेचे रुपडे पालटले आहे. काम पूर्ण झाल्यानंतर (दि.२४ एप्रिल) विजय नागरथ यांनी मुंबईतून तळेगाव येथे येऊन या कामाचे लोकार्पण केले.यावेळी मुंबईतील उद्योगपती श्री सुरेन्द्र मॅगी, श्री धांजिभाई गाला,श्री पैलाज गाभा, श्री भोमी दोतीवला, ग्रामस्थ मंडळी, पालक वर्ग, शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग उपस्थित होते

मा.पांडे साहेब

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.नरेश टी. म्हसकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रि.एम.ए.नं.५१९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०६/०६/२०२२

**श्री.मयुर रमेश शेळके**
वय : ३३ वर्षे, धंदा : शेती
रा.घर क्र.२६०७, मु.डेरवली,
पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
**ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी**
ग्रुप ग्रामपंचायत उसर्ली खुर्द
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई **कै.निर्मला रमेश शेळके** यांचा मृत्यू दि.२६/११/२००३ रोजी मौजे : डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड येथे उसर्ली खुर्द ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत झालेला आहे. अनावधनाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याची राहून गेली आहे. सबब अर्जदार यांनी त्यांची आई **कै.निर्मला रमेश शेळके** यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता आदेश मिळणेबाबत पनवेल येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू **कै.निर्मला रमेश शेळके** ह्या वर नमूद ठिकाणी मयत झालेल्या आहेत किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल, तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यनिशी आज दि.२९/०४/२०२२ रोजी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/–** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

मा.गोडसे सो।

**अर्जदारतर्फे वकील : ॲड.विशाल नवाळे**
**ॲड.एच.ए. भगत**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५२९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१५/६/२०२२

**१) श्री.सचिन पवन पारिक**
वय : २८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
**२) श्रीमती.किरण पवन पारिक**
वय : ५३ वर्षे, व्यवसाय : घरकाम
वरील दोघेही रा.पवन पारिक, रुम नं.३०२,
कनक संस्कृती, कफनगर, रॉयल कॉस्मो जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मयत **श्री.पवनकुमार बँकटलाल पारिक** हे दि.२०/०२/२००५ रोजी ठिकाण : २६, श्रीनाथ अपार्टमेंट, सरकारी वसाहत जवळ, जुना ठाणा नाका रोड, पनवेल येथे मयत झाले. कसबे पनवेल, ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील नमूद केलेली मिळकत ह्या मयत **श्री पवनकुमार बँकटलाल पारिक** यांचे मालकीची होती व आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**१) कसबे पनवेल, ता.पनवेल येथील फायनल प्लॉट नं.११८/३, कनक संस्कृती, फ्लॅट नं.३०२, तिसरा मजला, पनवेल, क्षेत्रफळ ६३५ चौ.फूट आणि टेरेस ६४ चौ.फूट (बिल्टअप)**

**२) कसबे पनवेल, ता.पनवेल येथील फायनल प्लॉट नं.११७/३, नालंदा को.ऑप.हौ.सो.लि., फ्लॅट नं.२०१, दुसरा मजला, क्षेत्रफळ ७४२ चौ.फूट (बिल्टअप)**

वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत मयत **श्री.पवनकुमार बँकटलाल पारिक** याचे वारसांनी म्हणजेच वर नमूद अर्जदारांनी मयत श्री.पवनकुमार बँकटलाल पारिक यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत अशा आशयाचा वारस दाखला मिळणेसाठी ना.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. सबब अर्जदार नं.**१) श्री.सचिन पवन पारिक व २) श्रीमती.किरण पवन पारिक** हे मयत पवनकुमार बँकटलाल पारिक यांचे कायदेशीर वारसदार आहेत या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीच्या कोणत्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्या त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष कागदपत्रांसह हजर राहून लेखी घ्यावयाच्या आहेत. परंतु मुदतीत हरकती न आल्यास त्याचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
दि.२८/०४/२०२२

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF DISTRICT JUDGE, PANVEL-RAIGAD
CIVIL MISC. APP. 32/2022
Exh : 7/D

**SMT.AVNEET KAUR GURMIT SINGH GUPTA**
Age : 35, Occ. Service
FLAT NO. 704, KRISHNA KUNJ CO-OP HSG. SOCEITY, PLOT-38, SECTOR-9, KAMOTHE, NAVI MUMBAI-410209 — Applicant
Versus
NIL — Non-Applicant

That **SMT.AVNEET KAUR GURMIT SINGH GUPTA** is the mother, natural guardian of minors namely Kum.TAMAN SINGH GURMIT SINGH GUPTA, propose to sell the undivided share in the property description is in the name of the minor is attached.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**undivided share in Flat No.704, Krishna Kunj Co-op Hsg. Society, Plot-38, Sector-9, Kamothe, Panvel, District-Raigad-410209, Total measuring 35 Sq. Meter (Built-up).**

You the member of public are hereby given notice to appear in the **IN THE COURT OF DISTRICT JUDGE, PANVEL, RAIGAD** in personal or by pleader duly instructed to file your Say/Objection in any within 30 (thirty) days from the date of publiction of this public notice and which is the application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and Seal of this court of this 29 th April 2022

Sd/- Jr.Clerk Court of District Judge, Panvel — (Court Seal) — Sd/- Asst.Superintendent Court of District Judge, Panvel

पृष्ठ क्र.१ वरुन...

## बँक ठेवीदारांचे २ मे रोजी लाक्षणिक धरणे आंदोलन

जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक CBI, ED चे प्रतिनिधी, ठ्झख चे अधिकारी, सहकार क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी व ठेवीदार प्रतिनिधी व याचिकाकर्ता नरेन जाधव यांची नियुक्ती करण्यात आली.

या समितीचे मुख्य काम अफरातफर केलेले ५९८.७२ कोटी रुपये वसूल करणे व बँक पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न करून ठेवीदारांना दिलासा देणे असे आहे. परंतु ५९८.७२ कोटी रकमेपैकी केवळ ५.५ कोटी इतकीच रक्कम वसूल झाली आहे. न्यायालयाने घोटाळेबाज आरोपी व बड्या बोगस थकीत कर्जदारांवर कारवाई करून त्यांच्या मालमत्ता जप्त करण्यासाठी सांगितले होते. यापैकी काही मालमत्ता जप्त करण्यात आली खरी परंतु काही मालमत्तांचे परस्पर हस्तांतरण, बेकायदेशीररित्या विक्री सुरू आहे. यावर कारवाई होणे गरजेचे आहे. परंतु प्रशासन व संबंधित अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून बँक बुडव्यांना साथ देत आहेत. यामुळे संतप्त झालेल्या ठेवीदारांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त करण्यासाठी लाक्षणिक धरणे आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. तसेच शासनाने मे.प्रियेश लँड डेव्हलपर्स यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या अफिलास विरोध करणे, आक्षेप घेणे याकरिता आंदोलन छेडले असल्याचे नरेंन जाधव यांनी सांगितले.

बँक घोटाळ्यातील मुख्य आरोपी शिशिर धारकर हे जनतेची दिशाभूल करीत आहेत. बँकेची मालमत्ता विकण्याचे त्यांना कोणतेही अधिकार नाहीत. या मालमत्ता धारकर विकू शकत नाहीत. मालमत्ता विकून ठेवीदारांचे पैसे परत करण्याचे धारकरांचा आश्वासन पूर्णतः खोटा आहे, असा दावा नगरसेवक अजय क्षिरसागर यांनी केला. शिशिर धारकर यांनी २०१० साली कबूल केल्याप्रमाणे दर महिना ५० कोटी प्रमाणे प्रथम बँकेचे पैसे भरावे व नंतरच राजकारण करावे असा सल्लाही अजय क्षिरसागर यांनी यावेळी दिला.

बँकेकडे कर्जदारांची जप्त केलेली मालमत्ता, बँकेची स्वतःची मालमत्ता, दोषी संचालकांची जप्त केलेली मालमत्ता व ठेवीदारांच्या पैशातून घेतलेल्या मालमत्ता अशा मालमत्ता आहेत. या मालमत्तांवर पेण अर्बन बँकेचे व ED चे बोझे आहेत. या मालमत्तांचे व्यवहार कोर्टाच्या देखरेखी खालीच होतील अशी माहिती नरेन जाधव यांनी दिली.

## एम.पी.९३ हा भूखंड लवकरच माथेरान पालिकेकडे हस्तांतरित करणार

वनविभागाचा अभिप्राय घेण्यात यावा असा शेरा मारल्याने ही फाईल वनखात्याच्या विविध खात्याकडे १३ वर्षानंतर कोकण आयुक्तांकडे आली आहे महसूल विभागाच्या सचिवांकडून ती माथेरान पालिकेकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. माथेरान मधील काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने गावाच्या हिताच्या दृष्टिकोनातून बुधवार दि.२७ एप्रिल रोजी महसूल मंत्र्यांची घेतलेली भेट अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. माथेरानची सध्याची पार्किंग व्यवस्था अत्यंत अपुरी पडते बऱ्याचदा गर्दीच्या वेळी वाहने घाटात उभी करावी लागतात एम.पी.९३ हा साडेपाच एकरांचा भूखंड पालिकेस मिळाला तर अद्यावत पार्किंग व्यवस्था तयार होईल.

रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत, जिल्ह्याच्या महिला अध्यक्ष श्रध्दा ठाकूर, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, माथेरान शहर महिला अध्यक्ष वर्षा शिंदे, ज्येष्ठ नेते मिलिंद पाडगावकर , माथेरान काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष शुभम गायकवाड, हर्ष शिंदे,सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिनी पनवेलमध्ये अवतरणार परंपरा महाराष्ट्राची

महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने होणार आहे . या कार्यक्रमांमध्ये आपण महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणारे आणि नृत्य व गीते सादर करणार आहोत त्यामध्ये वारकरी दिंडी गोंधळ जोगवा भारुड वाघ्या मुरळी आदिवासी नृत्य धनगर गीत कोळी गीत पोवाडा तसेच महाराष्ट्रातील पारंपरिक सणांचे दर्शनाचा नजराणा कलारसिकांना सादर होणार आहे. सदरचा कार्यक्रम हा नागरिकांसाठी विनामूल्य असून मर्यादित आसन व्यवस्था असल्यामुळे प्रथम येणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल असे सांगण्यात आले.

## अवैध गौणखनिज उत्खननामुळे मांडला मानवी वस्तीस धोका

दुर्घटना व महाड रायगड मध्ये तलिया गाव दुर्घटना हे नजरेसमोर असताना अशा घटना याठिकाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे स्थानिक प्रशासन ग्रामपंचायत,तहसील कार्यालय – मुरुड, उपविभागीय कार्यालय अलिबाग, वनविभाग व जिल्हाधिकारी – रायगड यांचे दुर्लक्ष दिसून येत असून अशा कामाला संबंधिताचा वरदहस्त तर नाही ना ? असा सवाल उठत आहे.

शासनाच्या संबंधित अधिकारी वर्गाने यात लक्ष पुरवून वेळीच उपाययोजना करण्यात न आल्यास मालिन, तळिये सारखी दुर्घटना घडून मांडला हे गाव महाराष्ट्राच्या नकाशावरून कायमस्वरूपी नामशेष होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.याविरोधात वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून ग्रामस्थ आंदोलन करण्याच्या पावित्र्यात आहे.मग याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील.असे मांडला येथील मुरुड तालुका चर्मकार संघटनेचे अध्यक्ष सुरेश नांदगावकर यांनी म्हटले आहे.

मा.श्री.सोनावणे सो।

**अर्जदारांतर्फे वकील**
**सौ.अमृता अशोक नाईक**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५०६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/६/२०२२

**१) श्रीमती.सुनंदा नागेश खरटमोल**
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
**२) श्री.जतीन नागेश खरटमोल**
वय : २२ वर्षे, धंदा : नोकी
**३) कु.सुप्रिया नागेश खरटमोल**
वय : १२ वर्षे, धंदा : शिक्षण
अ.क्र.१ स्वतःकरिता व अ.क्र.३ ची
अज्ञान पालनकर्ती आई म्हणून
सर्व रा.बि.नं.९/ए, रुम नं.३०३,
पारिजातक को.ऑप.हौसिंग सोसायटी,
आर.सी.मार्ग, वाशी नाका, चेंबुर, मुंबई–४०००७४ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत **कै. नागेश अपन्ना उर्फ अप्पन्ना खरटमोल** यांची स्वकष्टार्जित, प्रत्यक्ष मालकीची व ताबेकब्जावहिवाटीतील मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पनवेल येथील फ्लॅट नं.०१, पाचवा मजला, कोनार्क प्लाझा–II को.ऑप.हौसिंग सोसायटी, फायनल प्लॉट नं.३४, सब प्लॉट नं.४ ए, ४ बी, ४ सी, पनवेल, ता.पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ क्षेत्र ३४५ चौ.फूट कारपेट**

**कै.नागेश अपन्ना उर्फ अप्पन्ना खरटमोल** यांचे दि.२१/०८/२०२१ रोजी के.जे.सोमया हॉस्पिटल, सायन, मुंबई येथे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस सदरील अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने/नी आपली/ल्या लेखी हरकत/ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधींमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारसदाखला दिला जाईल. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.२८ माहे एप्रिल सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

सोनावणे साहेब

**ॲड.माधुरी चतारे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५८२/२०२२
नि.नं.१०/ड
ने.ता.४/७/२०२२

**१) श्रीमती.माधुरी संजय राणे**
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
**२) कु.अपूर्वा संजय राणे**
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
सर्व रा.ए ६–१–१५, युगांतक को.ऑप.सोसा.,
माथेरान रोड, सुकापूर, पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी **संजय जाधव राणे** हे दि.१३/११/२०२१ रोजी विवरे बु, ता.रावरे, जि.जळगांव, येथे मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर मयत **संजय माधव राणे** यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**अ) फ्लॅट नं.ए ६/१, रुम नं.१५, युगांतक को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.सुकापूर, नवीन पनवेल, जि.रायगड ४१०२०६ बांधीव क्षेत्रफळ ५७५ चौ.फूट (बिल्टअप) ही सदनिका आहे.**

सदर सदनका **कै.संजय माधव राणे** यांनी त्यांचे हयातीत दि.०३/०६/१९९९ रोजीचे **''डीड ऑफ ट्रान्सफर''** या दस्ताद्वारे **श्री.के.सी.दिलीप कुमार** यांचेकडून खरेदी केली असून सदरचा ''डीड ऑफ ट्रान्सफर'' चा दस्त मे.दुय्यम निबंधक, पनवेल यांचे कार्यालयात दि.०३/०६/१९९९ रोजी दस्त क्रं.१७९४ अन्वये नोंदविला आहे. सदर कै. संजय माधव राणे हे सदर दस्ताद्वारे सदर सदनिकेचे मालक झाले आहेत.

**ब) सदनिका क्रं.२०३, दुसरा मजला, विघ्नहर्ता रेसिडेन्सी, सर्वे नं.२५, हिस्सा नं.१, प्लॉट नं.६, मौजे : काटरंग, ता.खालापूर, जि.रायगड, चटई क्षेत्रफळ २५५ चौ.फूट (कारपेट)**

सदर सदनिका **कै.संजय माधव राणे** यांनी त्यांचे हयातीत दि.१०/११/२०१८ रोजीचे **''सेल डीड''** या दरस्ताद्वारे मे.भगत एन्टरप्रायजेस यांचेकडून खरेदी केली असून सदरचा ''सेल डीड'' चा दस्त मे.दुय्यम निबंधक, खालापूर यांचे कार्यालयात दिनांक ०३/१२/२०१८ रोजी दस्त क्रं.कलर–४७६४–२०१८ अन्वये नोंदविला आहे. सदर कै.संजय माधव राणे हे सदर दस्ताद्वारे सदर सदनिकेचे मालक झाले आहेत.

वरील परिच्छेद अ) तसेच परिच्छेद ब) मध्ये नमूद केलेल्या दोन्ही सदनिका मिळकती सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता ते **कै.संजय माधव राणे** यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२९ माहे एप्रिल सन २०२२ रोजी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## विज वितरण कंपनीचा मनमानी कारभार ; विज ग्राहकाला दोन बिले

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

या अगोदरच महागाईच्या आगीत जनता पूर्णपणे होर-पळत असतांना यात भरीत भर म्हणून विज वितरण कंपनी कडून मार्च महिन्यात विज ग्राहकांना दोन बिले देण्यात आली असून एक बिल मिटर रिडींग प्रमाणे आहे तर दुसरा बिल अतिरिक्त सुरक्षा ठेव या नावाखाली देण्यात आला आहे.

जर रिडींग प्रमाणे ५००/- रु. असेल तर अतिरिक्त सुरक्षा ठेव बिल हा ५००/-रु देण्यात आला आहे म्हणेजच विज ग्राहकाला एकूण १०००/- रु. भरावे लागणार आहे. अशी लूट विज वितरण कंपनी कडून सुरु केली आहे.

दहा वर्षांपूर्वी विज ग्राहकाला लाईट बिल हा दोन महिन्यातून एकदा येत होता व केव्हा लाईट जात नव्हती. कोणताही भारनियम नव्हता.आता वारंवार लाईट ही खंडित केली जात आहे. व प्रत्येक महिन्याला येणारा लाईट बिलाची रक्कम ही दुप्पट झाली आहे. अगोदरच भरमसाठ येणाऱ्या लाईट बिलाने जनतेचे कंबरडे मोडले आहे यात भरीत भर अतिरिक्त सुरक्षतेच्या नावाखाली दुसरा बिल आल्यामुळे विज ग्राहकांची झोप उडाली आहे.

दोन वर्षा पासून कोरोनामुळे अनेकांना नोकऱ्या गमवाया लागल्या आहेत नंतर निसर्ग चक्री वादळ यातून सावरता असतांना पेट्रोल, डिझेल, स्वयंपाक गॅस, खाद्य तेल यांच्या किंमती वाढल्यामुळे लोकांना जिवन जगणे असाह्य झाले आहे.तर एक महिन्याचा बिल भरला नाही म्हणून गोरगरीब जनतेची त्वरीत लाईट कट केली जाते. पण लाईट गेल्या नंतर याची तक्रार नोंदवून ही तीन-चार दिवस लाईट सुरु केली जात नाही.

नवीन मिटर घेतांना मिटरची रक्कम घेतली जाते मग अतिरिक्त सुरक्षेच्या नावाखाली दुसरा बिल का दिला जातो असा प्रश्न विज ग्राहकांकडून केला जात आहे.

# जिल्ह्यातील मध्यवर्ती नागोठणे बसस्थानकाचा होणार कायापालट : दोन कोटी रुपयांचा निधी मंजुर

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रायगड जिल्ह्यातील महत्वाचे व मध्यवर्ती एस.टी. स्थानक असूनही गेली अनेक वर्षे दुर्लक्षित व दुरावस्था झालेल्या नागोठणे एस.टी. स्थानकासाठी दोन कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे स्थानकाचा कायापालट होऊन स्थानक सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज होणार आहे. विधानपरिषदेचे आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी याप्रकरणी केलेल्या पाठपुराव्यामुळेच हे शक्य झाले असून यापुढेहो नागोठणे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे अभिवचन आ. तटकरे यांनी दिले आहे.



नागोठणे शहरातील एस.टी बसस्थानकाची दयनीय अवस्था झाल्याने त्याकडे आपण जा-तीने लक्ष घालावे अशी विनंती राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागीय नेते भाई टके व सहका-यांनी कार्यतत्पर आमदार अनिकेतभाई तटकरे यांना केली होती. त्यानंतर आमदार तटकरे यांनी नागोठणे एसटी बसस्थानकाच्या दुरावस्थेबाबत परिवहन मंत्री ना. ॲड. अनिल परब व उपमुख्यमंत्री तथा राज्य परिवहन विभागाचे महाव्यवस्थापक ना. अजितदादा पवार यांना एका निवेदना द्वारे निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. यासाठी आ. तटकरे यांनी सतत पाठपुरावाही केला होता. अखेर आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या पाठपुराव्याला यश आले असुन नागोठणे एसटी बसस्थानकाची नव्याने बांधकाम करण्यासाठी दोन कोटी रुपये निधी मंजुर करण्यात आला आहे. या निधीस प्रशासकीय मान्यताही मिळाली असल्याने आता लवकरच नागोठणे एसटी बसस्थानक सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज होणार आहे. त्यामुळे नागोठणेकर नागरिक तसेच प्रवासी वर्गाकडून आमदार अनिकेतभाई तटकरे यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

दरम्यान नागोठणे शहर व विभागातील विकासकामांसाठी आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी सव्वादोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देऊन त्या विकासकामांचे नुकतेच लोकार्पन व भुमीपुजन केल्याने नागोठणे शहर व विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे कृतीतून दाखवुन दिले होते. असे असतांनाच आता नागोठण्यातील सर्व प्रवाशांसाठी महत्वाचा विषय असलेल्या नागोठणे एसटी बसस्थानकाच्या नव्याने करण्यात येणाऱ्या बांधकामासाठी लागणाऱ्या या निधीचे प्रशासकीय मान्यता पत्र शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे पेण येथील जनसंपर्क कार्यालयात नागोठणे येथील कार्यकर्त्यांना आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी दिल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वाता-वरण आहे. यावेळी नागोठणे विभागीय नेते भाई टके, शिवरामभाऊ शिंदे, उदय जवके, विलास चौलकर, संतोषभाई कोळी, बाळासाहेब टके, सचिन कळसकर, विनय गोळे, दिपेंद्र अवाद, अखलाक पानसरे, कुणाल तेरडे, रोशन पारंगे, दिनेश घाग, रविंद्र वाजे, कादिर रिफाई तसेच पेण तालुका अध्यक्ष दयानंद भगत, जिल्हा सरचिटणीस परशुराम मोकल, पेण विधानसभा मतदार संघ अध्यक्ष नरेंद्र ठाकुर, शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकुर, पाली नगराध्यक्षा गीताताई पालरेचा, पेण माजी नगराध्यक्ष संतोष शुंगारपुरे, प्रभाकर लांगी आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुरुडमध्ये तळपत्या उन्हाच्या झळा ; उष्णतेमुळे अंगाची लाही लाही

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मागील आठवड्यात हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार हवामान ढगाळ राहील व उष्णता वाढेल.या इशा-यानुसार आजही तळपत्या उन्हाच्या झळांचा अनुभव मुरुड वासीयांना आला. दुपारच्या वेळेत तर अतीउष्णतेमुळे अक्षरशः अंगाची लाही लाही होत होती. उष्णतेमुळे पर्यटनावर परीणाम झाला असून पर्यटक व नागरिकांनी घरातच राहणे पसंत केले असल्याचे चित्र दिसून आले.



याच महिन्यात मागील आठवड्यात उष्णतेची लाट आली होती. त्यावेळी मुरुडचा पारा ४०ओ वर गेला होता. ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे मुरुड मधील तापमान काही अंशाने कमी झालेले पहावयास मिळाले मात्र पुन्हा वातावरण स्वच्छ होऊन कडक सूर्यप्रकाश पडून वातावरण तापायला सुरुवात झाली. आज दुपारपर्यंत मुरुड चांगलेच तापले होते. त्यामुळे मुरुडच्या नागरिकांनी व पर्यटकांनी देखील घरातच बसून राहणे पसंत केले. काही महत्त्वाच्या कामासाठी नागरिक घराबाहेर पडताना दिसत होते. त्यामुळे मुरुड शहरात दुसऱ्या दिवशीही क्लायमेट लॉकडाऊन पाहावयास मिळाले. पोफळीच्या बागांनी बहरलेल्या मुरुड शहाराचे तापमान बाहेरील तापमानाच्या १ ते २ अंशाने जरा कमी असते तरी आजच्या प्रखर उष्णतेमुळे पर्यटक व नागरिकांनी घरातच राहणे पसंत केले असल्याचे चित्र दिसून आले.

# देशी दारू विक्री करणाऱ्यास अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**


घरातूनच बेकायदा देशी दारू विक्री करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून सहा हजार रुपयांची देशी दारू जप्त केली आहे.

छोटा खांदा गावातील शिधावाटप कार्यालयानजीक एका घरातून देशी दारूची विक्री केली जात होती. याबाबत पोलीस नाईक दीपक डोंगरे यांना माहिती मिळाली होती. त्यांनी गुन्हे अन्वेषण शाखा पनवेल युनिट - २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांना हा प्रकार कळविल्यानंतर सदर ठिकाणी पथकाने कारवाई केली. यात आरोपीच्या घरात पोत्यात दारूच्या बाटल्या आढळून जप्त करण्यात आल्या आहेत. एकूण सहा हजार ४२५ रुपयांचा मुद्देमाल आहे.

# शुभम रांजाणे टॅटू स्पर्धेत अव्वलस्थानी ; माथेरानच्या शिरपेचात मानाचा तुरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

पंजाब येथे आयोजित करण्यात आलेल्या टॅटू स्पर्धेत माथेरान मधील शुभम गणपत रांजाणे यांनी प्रथम क्रमांक पटकावून माथेरानच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवलेला आहे. त्यामुळे त्यांचे विविध स्तरातून कौतुक केले जात आहे.



लहानपणापासून चित्रकलेची नितांत आवड असल्यामुळे आणि शाळेत असताना सुध्दा चित्रकलेत अनेक पारितोषिक त्यांनी पटकावली आहेत. त्यामुळे त्यांनी आपला कल टॅटू कलेकडे वळवला आहे. त्यांचे वडील गणपत रांजाणे हे माथेरान मध्ये मोलमजुरी करून त्यांनी शुभम याला कॉलेज पर्यंतचे शिक्षण दिले आहे. मागील दहा वर्षांपासून ते याच क्षेत्रात कार्यरत असून सध्या लोणावळा येथील आपल्या दुकानात त्यांनी टॅटू काढण्याचा व्यवसाय सुरू केला आहे.त्यास ग्राहकांकडून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. तर अनेक सिनेमा कलाकार सुध्दा त्यांच्याकडून टॅटू काढून घेताना दिसतात.

पंजाब टॅटू फेस्टिव्हल मध्ये देशातील विविध भागातील टॅटू कलाकारांना या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निमंत्रित करण्यात आले होते. भारतातून एकूण २५० स्पर्धक यामध्ये महाराष्ट्रातील २० स्पर्धकांनी हजेरी लावली होती. यामध्ये दोन कॅटेगरी डिझाइन मध्ये (ओरिजिनल आर्ट वर्क ) शुभम रांजाणे यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे.अनेक दिग्गज टॅटूचे कलाकार यावेळी स्पर्धेत सहभागी झाले होते. सलग तीन दिवस ह्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शुभम यांनी लाईव्ह टॅटू (ओरिजिनल आर्ट वर्क) स्केच करून आयोजकांना मंत्रमुग्ध केले. एक सुंदर आर्ट स्केच करत आयोजकांची आणि उपस्थित प्रेक्षकांसह अन्य कलाकारांची वाहवा मिळवून दुसऱ्या कॅटेगरी मध्ये प्रथम क्रमांक पटकावला. यावेळी आयोजकांनी त्यांना आकर्षक ट्रॉफी आणि पंजाब आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे प्रमाणपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.


मा.पांडे साहेब

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.नरेश टी. म्हसकर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रि.एम.ए.नं.५२२/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०६/०६/२०२२

**श्री.रामदास काळु उर्फ काळुराम उलवेकर**
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
**ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी**
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बे,
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई **कै.चंद्रभागा काळू उलवेकर** यांचा मृत्यू दि.१५/०१/१९७९ रोजी मौजे : मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मोर्बे ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत झालेला आहे. अनावधनाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करणेची राहून गेली आहे. सबब अर्जदार यांनी त्यांची आई **कै.चंद्रभागा काळु उलवेकर** ह्यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता आदेश मिळणेबाबत पनवेल येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू **कै.चंद्रभागा काळु उलवेकर** ह्या वर नमूद ठिकाणी मयत झालेल्या आहेत किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यनिशी आज दि.२९/०४/२०२२ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**



Hon'ble Mujawar Court
**Adv. Manjit Kaur**

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE (SENIOR DIVISION) AT PANVEL
MISC. APPLICATION No.504 OF 2022
Exh :8/D
Next Date : 18/06/2022

**1) SMT. USHA BHIKHALAL KARIA**
**2) MRS. VIBHA CHIRAG SANGHANI**
**3) MRS.MEGHANA BHIKHALAL KARIA**
**4) MRS. RITESH BIKHALAL KARIA**
**5) MR. MILAN BHIKHALAL KARIA**
All are residing at : 10/603, fam CHS, PLOT NO.19, 19 A, SECTOR 11 NEAR BALAJI GARDEN NAVI MUMBAI Applicants
V/s
NIL Opponent

Let it be known to all concerned that deceased late **MR.BHIKHALAL GIRDHARDAS KARIA** therefore the applicants have filed the Misc application No. 504/2022 application for heirship certificate under the provision of Bombay regulation act VIII of 1827

**SCHEDULE OF IMMOVABLE PROPERTY**
**50% share in flat admeasuring about 623.558 Sq.ft Carpet area**
**MILLENIUM PARADISE, PLOT NO.07, SECTOR-10 E, 8 TH FLOOR, ROOM NO. 801, VILLAGE, ROADPALI, KALAMBOLI, TAL-PANVEL, DIST-RAIGAD**

If any person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said property, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invited. Then they may appear in person or through their advocate, objecting this application in the court of civil judge S.D. at Panvel, Dist-Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of this notice then this Hon'ble court will proceed the pass the necessary order thereon which please note.
Date : 29/04/2022

**Sd/-**
**Jr.Clerk**
**C.C.S.D.**
**Panvel**
Court Seal
Sd/-
Asst.Superintendent
Civil Court S.D.
Panvel



श्री.मुजावर सो
**अर्जदाराचे वकील श्री.विकास एस. पाटील**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.५६८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/६/२०२२

**१) श्री.दिपक कृष्णा कदम**
वय : ४९ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.४, निर्मन आशा को.ऑ.हौ.सो.लि.,
निर्मन नगर, निळे मोरे, नालासोपारा (पश्चिम)
**२) श्री.महेश कृष्णा कदम**
वय : ४८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.टी-७, इंदिरा निवास १५८,
लालबहादूर शास्त्री रोड, कुर्ला वेस्ट,
मुंबई सर्बबन, महाराष्ट्र ४२२२७०
**३) श्री.नरेश कृष्णा कदम**
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.२०२, एन.एम.रोड, चिंचआळी,
घणसोली, नवी मुंबई अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचे वडील **कै.कृष्णा धारराव कदम** रा.अप्पा जाधव चाळ, हनुमान नगर, कांदिवली पूर्व हे दि.१२/०४/२००४ रोजी त्यांच्या घरी म्हणजेच अप्पा जाधव चाळ, हनुमान नगर, कांदिवली पूर्व येथे मयत झाले आहेत. कै.**कृष्णा धारराव कदम** यांची पत्नी **कै.पुष्पा कृष्णा कदम** ह्या दि.१२/०३/२०२० रोजी मौजे २५८ इंदिरा निवास एल.बी.एस.मार्ग, कुर्ला वेस्ट, ग्रेटर मुंबई, महाराष्ट्र ४०००७० येथे मयत झाल्या आहेत. तसेच **कै.कृष्णा धारराव कदम** यांची आई **कै.यशोदाबाई धारराव कदम** ह्या दि.१६/०१/१९९० रोजी मौजे : इंदिरा निवास रुम नं.४, लाल बहादूर शास्त्री, मुंबई ४०००७० येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार हे कै.कृष्णा धारराव कदम यांच्या खालील मिळकतीचा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज केला तिचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | गट क्रमांक | उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| कोयनावेळे | २ | ३ | ०-३८-२० | २.७५ |
| | | | ०-०२-३० | |

वरील अर्जदार हे **कै.कृष्णा धारराव कदम** यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्याही करेल आणि ते जर **कै.कृष्णा धारराव कदम** यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२९/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मे.राव साहेब सो

**अर्जदारांतर्फे वकील**
**सौ.अमृता अशोक नाईक**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५३१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.८/६/२०२२

**१) श्रीमती.अर्चना अनिल पानसरे उर्फ पाणसरे**
वय : ६७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.१०१, श्रीजी कृपा को.ऑप.हौ.सो.,
प्लॉट नं.६२/१, जुना ठाणा नाका रोड,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
**२) श्री.रोहित अनिल पानसरे उर्फ पाणसरे**
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.१०१, श्रीजी कृपा को.ऑप.हौ.सो.,
प्लॉट नं.६२/१, जुना ठाणा नाका रोड,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
सध्या रा.मेसाईद इंडस्ट्रीयल सिटी, एस.एफ.१४४,
बिल्डींग नं.४, झोन ९२, स्ट्रीट ४२९,
पोस्ट बॉक्स नं.५०१५५, कतार
**३) श्री.राजेश अनिल पानसरे उर्फ पाणसरे**
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.१२१, पहिला मजला, बिल्डींग नं.२,
एफ विंग, सत्यज्योत, स.नं.१४६/३+४+५ब,
मौजे : आदई, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
अ.क्र.३ स्वतःकरिता व अर्जदार क्र.२ यांचे
कुलमुखत्यारी म्हणून अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत **कै.अनिल सुंदर पानसरे उर्फ पाणसरे** यांची स्वकष्टार्जित, प्रत्यक्ष मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीतील मिळकत होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**१/अ) मौजे : पनवेल येथील फ्लॅट नं.१०१, श्रीजी कृपा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.६२/१, जुना ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६.**

**क्षेत्र ४४.४२ चौ.मी. कारपेट अधिक ९.७६ चौ.मीटर कारपेट. या मिळकतीमधील कै.अनिल सुंदर पानसरे उर्फ पाणसरे यांचा निम्मा हिस्सा.**

**१/ब) मौजे : आदई येथील फ्लॅट नं.१२१, पहिला मजला, बिल्डींग नं.२, एफ विंग, सत्यज्योत, स.नं.१४६/३+४+५ ब, मौजे : आदई, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**

**क्षेत्र ४२७ चौ.फूट कारपेट अधिक ३६ चौ.फूट ओपन टेरेस. या मिळकतीमधील कै.अनिल सुंदर पानसरे उर्फ पाणसरे यांचा निम्मा हिस्सा.**

**कै.अनिल सुंदर पानसरे उर्फ पाणसरे** यांचे दि.०७/०९/२०२० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस सदरील अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदाराने / नी आपली / ल्या लेखी हरकत / ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधींमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.२९ माहे ०४ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



Hon'ble Mujawar Court
**Applicants Advocate : Adv. Dinesh D. Patil**

**PUBLIC NOTICE**

IN THE HON'BLE CIVIL COURT-SENIOR DIVISION AT PANVEL
CIVIL MISSLLENEOUS APPLICATION : 612/2022
Exh :8/D
Next Date : 7/06/2022

**Late Kamal Dube through its Legal Heirs:**
**1) Smt. Anita Dube**
W/O : Kamal Dube
Age : 59 Years, Occupation : Retired
Res. At : J/B/1/02, Cosmopolitan Co-op. Housing Society, Takka, Village-Takka, Tal.Panvel, Dist-Raigad
**2) Apoorva Dube**
D/O : Kamal Dube
Age : 32 Years, Occupation : Service
Res. At : Flat No.609, National Park, Plot No.445, Takka-Panvel, Tal.Panvel, Dist-Raigad
**3) Arushi Dube**
D/O : Kamal Dube
Age : 30 Years, Occupation : Service
Res. At : J/B/1/02, Cosmopolitan Co-op. Housing Society, Takka, Village-Takka, Tal.Panvel, Dist-Raigad
**4) Shakuntala Rani Dube**
W/O : Manmohan Nath Dube
Age : 90 Years, Occupation : Retired/H.W.
Res at : Manmohan Nath Dube, C-5A, Gangotri Enclave, Alaknanda South Delhi, Delhi-110019 Applicants
Versus
None Defendants

This is to bring to your notice at large that, **Late Kamal Dube** is died on dated : 10/02/2022 at AADHAR MULTISPECIALITY HOSPITAL AND ICU, TALUKA-PANVEL, DISTRICT-RAIGAD, wherein below mentioned residential flat property is in the name of the deceased Kamal Dube and his wife Smt. Anita Dube, which is in the location of Panvel City, Taluka-Panvel, District-Raigad.

The deceased and his wife purchased the below mentioned property jointly through Registered Deed of Confirmation on dated 09/02/2004. The Said Deed of Confirmation is registered before the Sub-registrar offices at Panvel. The property description is as below :

**Property Description**
**Residential Flat Description**
**M/s. Cosmopolitan Co-operative Housing Society Limited, Flat No. J.B./1/02, First Floor, Plot No. FP/457 AND 290/2B, Area admeasuring at 870 Square Feet (Built-up Area) which is equivalent to 80.85 Square Meters Situate at : Panvel City, Taluka-Panvel, District-Raigad, State : Maharashtra, Pin Code-410206**

**Above is the description of the property.**

The Applicants are the only legal heirs to deceased Kamal Dube. Applicant No.1 is wife of the deceased, Applicant No.2 & 3 are daughters and applicant No.4 is mother of the deceased. Therefore these applicants filed Civil Miscellaneous application in this court to obtain Legal Heirship Certificate of Late Kamal Dube, except the above said applicants no any other legal heirs to the deceased Kamal Dube.

Therefore on issuance of legal Heir ship Certificate to the applicants if any person having any objection about this C.M.A. No.612/2022, then they can come with their objection in the Hon'ble Civil Court at Panvel, within 30 days from the issuance of this public notice. But within 30 days if no one can raise any objection then this court can decide the application and will be issue the legal heir ship certificate of Kamal Dube which please note.

Seal and signed and issued by the Hon'ble Civil Court Senior Division at Panvel.

Sd/-
Jr.Clerk
Sr.Division-Civil
Court at Panvel
Court Seal
Sd/-
Asst.Superintendent
Sr.Division-Civil
Court at Panvel

# संक्षिप्त...

## रवी मुंढे यांच्या मातोश्री जानकी रामजी मुंढे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । तळा**

महाराष्ट्र भाजपा सचिव रवीभाऊ मुंढे यांच्या मातोश्री श्रीमती जानकी रामजी मुंढे यांचे आज दि.२९ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले मृत्यू समई त्यांचे वय १०७ वर्षे होते. अत्यंत प्रेमळ, मायाळू असा त्यांचा स्वभाव होता, गरिबीतून कष्ट करत त्यांनी त्यांच्या कुटुंबाचा सांभाळ केला मुंढे यांचा परिवार खूप मोठा असून जानकी रामजी मुंढे यांचे निधन झाल्याचे समजताच त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी पंचकृषीतील आप्तेष्ट, नातेवाईक प्रतिष्ठित नागरिक, विविध राजकीय पक्षातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जनशिक्षण संस्था प्रशिक्षणार्थिना प्रमाणपत्रांचे वाटप

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

जनशिक्षण संस्था रायगड यांच्या मार्फत म्हसळा येथे मोंटेसरी, इलेक्ट्रिसियन, आणि नर्सिंग चे कोर्स सुरु आहेत. या संस्थे मार्फत गेली अनेक वर्षे म्हसळा येथे कोर्सेस सुरु आहेत. अश्याप्रकारचे अनेक कोर्सेस द्वारे युवकांना स्वतः च्या पायावर सक्षम पणे उभे राहण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. कोर्स पूर्ण झाल्यावर भारत सरकारचे अधिकृत प्रमाण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. या केंद्रातून कोर्स घेऊन बाहेर पडलेल्या प्रशिक्षणार्थिना मुंबई, पनवेल आणि पुण्यासारख्या शहरामध्ये रोजगार मिळाला आहे. ही तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे डॉ. कोकाटे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. हे केंद्र चालवीणाऱ्या सौ. रोहिणी सोनवणे यांनी खूप विधायक उपक्रम राबविल्याचे तहसीलदार समीर घारे यांनी सांगून त्यांना लागणारे सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.याप्रसंगी मांदाटणे सरपंच चंद्रकांत पवार, विनयकुमार सोनवणे, खरसई सरपंच निलेश मांदाडकर आदि मान्यवर उपस्थित होते.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# दोन वर्ष जनसेवेची मोहिमेंतर्गत ठाणे येथे विभागीय प्रदर्शन

## पत्रकार परिषदेत विभागीय उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांची माहिती

**दै.रायगड नगरी । ठाण**

शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी कोकण विभागीय माहिती कार्यालयातर्फे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत सचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. दोन वर्ष जनसेवेची, महाविकास आघाडीची या मोहिमेंतर्गत होणाऱ्या या विभागीय प्रदर्शनाचे उद्घाटन नगरविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दि. १ मे रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे, अशी माहिती उपसंचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.



कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित विकास प्रदर्शनाविषयी माहिती देण्यासाठी ठाणे जिल्हा माहिती कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत उपसंचालक डॉ. मुळे बोलत होते. ठाण्याचा सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या आणि शतकी वाटचाल करणाऱ्या टाऊन हॉलमध्ये हे प्रदर्शन होणार असून ते दि. १ ते ५ मे पर्यंत सर्वांसाठी खुले राहणार असल्याचे डॉ. मुळे यांनी यावेळी सांगितले.

या उद्घाटन सोहळ्यास केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील, राज्याचे गृहनिर्माण मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड, खासदार सर्वश्री डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, कुमार केतकर, राजन विचारे, डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार सर्वश्री निरंजन डावखरे, रविंद्र फाटक, बाळाराम पाटील, रमेश पाटील, गणेश नाईक, किसन कथोरे, दौलत दरोडा, रविंद्र चव्हाण, प्रताप सरनाईक, गणपत गायकवाड, डॉ. बालाजी किणीकर, संजय केळकर, श्रीमती मंदा म्हात्रे, शांताराम मोरे, महेश चौगुले, कुमार आयलानी, श्रीमती गीता जैन, विश्वनाथ भोईर, रईस शेख, प्रमोद पाटील, कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील, ठाणे महापालिका आयुक्त विपीन शर्मा, ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी उपस्थित राहणार आहेत.

किल्ल्याच्या तटबंदीप्रमाणे हुबेहुब उभारलेल्या या प्रदर्शनाच्या परिसरात शासनाचे महत्वपूर्ण उपक्रम व माहिती सुंदर रंगसंगती असलेल्या चित्रफलकांतून मांडण्यात आली आहे.

गेल्या दोन वर्षात शासनाने कोरोना सारख्या कठीण काळात केलेली कामगिरी, कृषी, आदिवासी विकास, शिवभोजन, महाआवास योजना, आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासह समाजातील सर्वच घटकांचा सर्वांगिण विकास याबाबत सचित्र माहिती प्रदर्शनाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे.

ठाण्याचा सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या टाऊन हॉलचे नूतनीकरण झाले असून त्याचे उद्घाटन आणि हे विभागीय प्रदर्शन एकाच वेळी होत असल्याने हा दुग्धशर्करा योग जुळून आला आहे. दि. १ ते ५ मे २०२२ पर्यंत सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत हे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे. त्या माध्यमातून नागरिकांनी शासकीय योजनांची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन उपसंचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे यांनी केले आहे.

# एडीएचएस मलेरिया मुंबई विभागातर्फे जागतिक मलेरिया दिन साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, ADHS मुंबई विभागातर्फे २५ एप्रिल २०२२ रोजी डॉ. बाळासाहेब सोनवणे, आरोग्य सेवा (मलेरिया) मुंबई विभागाचे सहाय्यक संचालक यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली NGO हार्ट फाउंडेशन आणि अपोलो हॉस्पिटल्स यांच्या समवेत जागतिक मलेरिया दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

विष्णुदास भावे सभागृह वाशी नवी मुंबई येथे नवी मुंबई. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.स्वप्नील लाळे, सहसंचालक, NVBDCP, महाराष्ट्र शासन आणि सन्माननीय अतिथी डॉ. सौ. गौरी राठोड, उपसंचालक, मुंबई विभाग, डॉ. जयकर एलिस, अध्यक्ष, हार्ट फाउंडेशन, डॉ. किरण शिंगोटे, युनिट हेड अपोलो हॉस्पिटल्स, नवी मुंबई, डॉ. रविकुमार आणि डॉ. भालचंद्र पेडंबकर, ओवेन्स क्राउनिंग. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी कोविड १९ महामारीच्या काळात प्राणाची आहुती देणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.



आपल्या स्वागतपर भाषणात डॉ.बाळासाहेब सोनवणे यांनी मलेरिया व वेक्टर बोर्न आजारांबाबत गेल्या पाच वर्षात केलेले कार्य, या आजारांना आळा घालण्यासाठी भविष्यातील नियोजन तसेच मुंबई विभागातील मलेरियाची ताजी परिस्थिती याविषयी थोडक्यात माहिती दिली. आपल्या सादरीकरणात डॉ. सोनवणे यांनी मलेरिया जनजागृती कार्यक्रमासाठी विविध स्वयंसेवी संस्थांचे योगदान आणि त्यांनी केलेल्या मदतीचे आभार मानले.

ADHS मुंबई विभागातील मलेरियाशी लढा देण्याच्या कार्यात योगदान दिल्याबद्दल एनजीओ आणि इतर देणगीदार संस्थांना स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात आले.

# अखेरीस प्रशासक सुरेखा भणगे यांनी सुरू केली पर्यटकांना शौचालये

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील विकास कामांतील एक भाग म्हणून नागरिकांच्या सोयीसाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून विविध ठिकाणी सुलभ शौचालयांची कामे लाखो रुपये खर्च करून पूर्ण करण्यात आली होती परंतु या शौचालयांमध्ये पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने ती बंद होती आणि संबंधीत ठेकेदारांच्या त्याचप्रमाणे नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे अल्पावधीतच या शौचालयांचे नळ वगैरे चोरीला गेले होते.

एकप्रकारे या वस्तूंची वाताहत झाली होती. येणाऱ्या पर्यटकांना विशेषतः महिला पर्यटकांना ही सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते तर वेळप्रसंगी जंगलाचा आधार घ्यावा लागत होता याकामी येथील गोकुळ रेस्टॉरंटचे मालक भास्करराव शिंदे यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक सुरेखा भणगे यांना सदरची बाब कथन केली आणि एकंदरीत पर्यटकांना ज्या ज्या अडचणी निर्माण होत आहेत त्याबाबत इत्यंभूत माहिती सांगितल्यावरून प्रशासक सुरेखा भणगे यांनी आपल्या खात्यातील कर्मचाऱ्यांना सूचना देऊन ताबडतोब त्याठिकाणी पाण्याची व्यवस्था करून पर्यटकांना शौचालय खुले केले आहे.

वास्तविक पाहता तत्कालीन लोकप्रतिनिधिंनी ह्या शौचालयांची कामे पूर्ण होत असतानाच त्याठिकाणी पाण्याची सोय उपलब्ध करून देणे आवश्यक होते परंतु त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्याचा पर्यटकांना मोठया प्रमाणावर त्रास झाला होता. कार्यतत्पर प्रशासक सुरेखा भणगे यांनी काही ठिकाणी या शौचालयांना पाण्याची सोय उपलब्ध करुन दिली आहे त्याचप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी अशी शौचालय उभारली आहेत त्याठिकाणी सुध्दा लवकरच ही सेवा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे. प्रशासकांकडे सार्वजनिक प्रश्नांची उकल लवकर होत असल्यामुळे भास्करराव शिंदे यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.



# रमजानच्या पवित्र महिन्यात राष्ट्रीय एकात्मता व सद्भावना वृध्दींगत होते : किरणकुमार सुर्यवंशी



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रमजान हा मुस्लीम समाजबांधवांसाठी अत्यंत धार्मिक व पवित्र महिना आहे. रमजानच्या पवित्र महिण्यात राष्ट्रीय एकात्मता व सद्भावना वृध्दीगंत होत असल्याचे प्रतिपादन डिवाएसपी किरणकुमार सूर्यवंशी यांनी केले. बेणसे येथील मस्जिद मध्ये गुरुवार दि.(२८) सुर्यास्तानंतर इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. यावेळी पोलिस उपविभागीय अधिकारी सूर्यवंशी बोलत होते. येथील हिंदू मुस्लीम समाजबांधवांचे सलोख्याचे नाते, ऐंक्य व मैत्रीपुर्ण सबंध जिल्ह्याला आदर्शवत ठरावे असे आहेत. असे कौतुकोद्गार डिवाएसपी सूर्यवंशी यांनी यावेळी काढले.

यावेळी मुस्लीम बांधवांना सर्व प्रकारची फळे उपहार देण्यात आला. बेणसे येथे ग्रामपंचायत, पोलिस स्टेशन व सर्वधर्मीय समाज बांधव यांच्या पुढाकाराने इफ्तार पार्टीची परंपरा अनेक वर्षापासून नियमीतपणे सुरु आहे. रमजान महिण्यात स्वयंपुढाकाराने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येते. पो.नि. तानाजी नारन–वार यावेळी म्हणाले की शिहु बेणसे नागोठने हा विभाग अत्यंत शांतताप्रिय आहे. येथे साजरे होणारे विविध सण व उत्सव हिंदू मुस्लीम बांधव एकोप्याने व गुण्यागोविंद्याने साजरे करतात. हे प्रेरक व कौतुकास्पद आहे असे पो.नि नारनवार म्हणाले.

सामाजिक कार्यकर्ते उद्धव कुथे म्हणाले की रमजान सणात हिंदू मुस्लीम बांधवांत ऐंक्य, प्रेम व बंधुभाव वृदींगत होताना दिसतो. ही बाब राष्ट्राचे अखंडत्व टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने अत्यंत पोषक असल्याचे उद्धव कुथे यांनी सांगितले. यावेळी अजीम बेणसेकर यांनी रमजान महिण्याचे व रोजा उपवासामागचे महत्व विशद केले. सुर्यादयापासून सुर्यास्तापर्यंत लहान मुले, आबाल वृदध, महिला हे निस्सीम श्रृदधेपोटी उपवास करतात. धार्मीक पावित्र राखत केल्या जाणार्या उपवासाला अनन्यसाधरण महत्व आहे. वर्षभरातील १२ महिण्यातून मुस्लीम समाजबांधवांसाठी अत्यंत पवित्र महिना मानला जातो. असे म्हटले.

मुजीप मोमिन म्हणाले या महिण्यात गोरगरीबांना धान्य, कपडे व आर्थीक सहाय्य केले जाते. गोरगरीब दुर्बल समाजघटकानी देखील रमजान सण साजरा करावा या उद्दे–शाने त्यांना सर्वोतोपरी सहकार्य केले जाते. या महिण्यात रात्रीच्या वेळेस पवित्र कुराणचे पठण केले जाते. महिन्याच्या शेवटी रमजान ईद साजरी केली जाते. असे मोमीन म्हणाले.

यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी , नागोठणे पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर , बेणसे ग्रामपंचायतीचे मा. उपसरपंच , तथा सदस्य उद्धव कुथे, माजी उपसरपंच राजेश गोरे,उपविभागप्रमुख अशोक भाई भोय, कामगार नेते लक्ष्मण खाडे, मा. तंटामुक्त अध्यक्ष संजयभाई भोय, सामाजिक कार्यकर्ते अजिम बेणसेकर, तंटामुक्त अध्यक्ष मुजीप मोमिन,उपशाखा प्रमुख बशीर मांडरे, पत्रकार धम्मशील सावंत, शौकत पित्त,ईलियास अत्तार, समिर चोगले, ईसाक पित्तु,नाविदभाई मोमिन, इस्माईल पित्तु, इस्माईल बेणसेकर, नंदकुमार कुथे, अनिल गोरे,साहील बेणसेकर, सलमान मोमिन, मनसुर मोमिन,अरबाज बेणसेकर, सलमान जुआरी, अदील बेणसेकर, मुसवीर मोमिन,आदि सर्व जाती धर्माचे ग्रामस्थ उपस्थित होते.

# पत्रकारांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पत्रकार विकास महामंडळाची स्थापना करा

## १ मे २०२२ रोजी प्रत्येक तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पत्रकारांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पत्रकार विकास महामंडळाची स्थापना करावी, अशी मागणी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनने (एबीजेएफ) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. पत्रकारांची आर्थिक स्थिती चांगली नसून त्यांना बँकांकडून कर्ज घेताना खूप अडचणींना सामोरे जावे लागते, त्यामुळे पत्रकारांचे जीवन सुधारण्यासाठी केंद्र सरकारने पत्रकार विकास महामंडळाची स्थापना करावी आणि त्या महामंडळामार्फत 'मुद्रा लोन' प्रमाणे या महामंडळाने पत्रकारांना व्यवसायासाठी ५० हजार ते १० लाखांचे कर्ज द्यावे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

यासोबतच पत्रकारांसाठी स्वतंत्र हेल्थ कार्ड, पत्रकारांसाठी टोलमाफी आणि डिजिटल मीडिया पत्रकारांसाठी ॲक्रिडेशन कार्ड अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन (–इगत्र) कडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जारी करण्यात यावे. पत्रकारांच्या मागण्यांकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी



अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनच्या वतीने १ मे २०२२ रोजी देशातील प्रत्येक तहसील कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचे अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन राष्ट्रीय उपाध्यक्ष फिरोज पिंजारी यांनी सांगितले.

राष्ट्रीय उपाध्यक्ष फिरोज पिंजारी पुढे म्हणाले की, अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश जी यांच्या नेतृत्वाखाली संघटना पत्रकारांच्या हितासाठी लढत आहे. त्यामुळे १ मे २०२२ रोजी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनच्या वतीने दिल्ली जंतरमंतर येथे धरणे आंदोलन करण्यात येणार होते, मात्र दिल्लीतील वाद आणि ईदमुळे १ मेच्या आंदोलनाला परवानगी देण्यात आली नाही. त्यामुळे आता प्रत्येक तहसील कार्यालयाबाहेर अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनचे पदाधिकारी आंदोलन करणार असल्याचे पिंजारी यांनी सांगितले.

न्यायव्यवस्था आणि पत्रकारांमुळेच आज लोकशाही जिवंत आहे. पत्रकार आपल्या लेखणीतून सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवणे, पीडितांना न्याय मिळवून देणे, गरिबांसाठी आवाज उठवणे, भ्रष्ट अधिकारी आणि नेत्यांना चाप लावण्याचे काम करीत असतात. ते म्हणाले, पत्रकार कोणीही असो. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडिया असो, पण तो पत्रकार आहे. अशा समाजासाठी आणि लोकशाहीसाठी जगणाऱ्या पत्रकारांना (समाजयोद्धा) शासकीय योजनांचा लाभ द्यावा, अशी मागणी पत्रकार फिरोज पिंजारी यांनी केली आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी एक दिवसीय नैसर्गिक सहलीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । चौक**

चौक जेष्ठ नागरिक संस्थेतील सर्व सभासदांसाठी चौक येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.हर्षल हनुमंते हे दरवर्षी वडील श्री. द्वारकानाथ हनुमंते यांच्या वाढदिवसानिमित्त एक दिवशीय सहल आयोजित करीत असतात. ह्या वर्षी वडिलांच्या लग्नाला ५० वर्षी पूर्ण झाल्याने तसेच त्यांच्या वयाचे ८० वर्षे पूर्ण झाल्यामुळे दोन्ही समारंभ आयोजित करत असताना सामाजिक बांधिलकी जपत ह्या वर्षी जेष्ठ नागरिकांसाठी काही तरी वेगळे करण्याचे ठरवले. गेले २ वर्षे कोरोना उपद्रव्यामुळे ज्येष्ठ नागरिकांन साठी एक दिवशीय नैसर्गिक सहलीचे आयोजन केले. कार्यक्रम गुरुवार दिनांक. २८–४–२२ रोजी स.११ ते दु. ४ वाजेपर्यंत त्यांच्या शेत माळ्यावर ठेवला होता. ह्यात सुमारे ७० ते ८० जेष्ठ नागरिक व महिलांनी भाग घेतला. ह्या वेळी द्वारकानात हनुमंते व त्यांच्या पत्नी सौ. मालती द्वारकानात हनुमंते ह्यांचा सत्कार करून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा देण्यात आल्या. ह्या नंतर काहींनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रवचनकार ह. भ. प. चैतन्य महाराज खंडागळे ह्यांनी आई– बापाचे महत्व ह्या वर व्याख्यान दिले. सत्कार समारंभ पार पडल्यानंतर जेष्ठ नागरिकांसाठी पंचपकवनांची मेजवानी, फळे,ताक,देण्यात आले. मनसोक्त वातावरणात फिरताना नागरिकांच्या चेहऱ्यावरचे हावभाव पाहण्या जोगे होते. ह्या कार्यक्रमात त्यांचे संपूर्ण मित्र परिवार, गजानन भोंडगे(सचिव), रमेश दळवी (उपसचिव), मुरलीधर साखरे(खजिनदार ),रंजना साखरे, सुरेश चौधरी, गजानन पारठे, यशवंत सकपाळ, उद्योजक विजय ठाकरे तसेच अनेक सदस्य उपस्थित होते.

# ड्रोन सर्व्हेबाबत पुढील आठवडाभरात प्रांताधिकारी बैठक घेणार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

ड्रोन सर्व्हेबाबत पनवेलची जनता अनभिज्ञ आणि संभ्रमात असल्यामुळे लोकांमध्ये या सर्व्हेबाबत कोणतीही माहिती नाही. हा होण–ारा सर्वे नागरिकांसाठी हितकारक आहे की नुकसानीचा हे देखील स्पष्ट होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शासनाच्या वतीने कोणतीही बैठक न घेता हे सर्व्हे सुरू आहेत. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी, बऱ्याच गावांमध्ये या सर्व्हेला विरोध झालेला आहे. यासाठी शेकाप तालुका चिटणीस राजेश केणी, क्रांतिकारी सेवा संघाचे अध्यक्ष नामदेव फडके, सामाजिक कार्यकर्ते शेखर शेळके, पंचायत समिती सदस्य स्वप्नील भुजंग, सामाजिक कार्यकर्ते गजानन पाटील आदी मान्यवरानी प्रांत यांची भेट घेऊन चर्चा केली.

प्रांत ऑफिसमध्ये प्रांताधिकारी पनवेल राहुल मुंडके यांच्यासोबत बैठक झाली. ड्रोन सर्व्हेबाबत एक बैठक घेऊन आजी–माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, आजी माजी सरपंच, सदस्य यांची लवकरच बैठक लावून यांच्यासमक्ष ड्रोन सर्व्हेबाबत माहिती देण्याचे प्रांत यांनी मान्य केले आहे. पुढील आठवडाभरात ही बैठक होणार आहे. यावेळी पनवेलमधील विविध विषयावर देखील चर्चा करण्यात आली.